सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १२२ | गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन





**श्री. प्रशांत पवार**
स्टॅम्प वेंडर, अमळनेर



**श्री. सचिन शिंदे**
अमळनेर



अमळनेर : केंद्र सरकारच्या राष्ट्रीय वयोश्री योजनेंतर्गत बुधवारी वृद्धांना जीवनोपयोगी साहित्य वाटप करण्यात आले. याप्रसंगी बोलता खासदार श्रीमती स्मिताताई वाघ. शेजारी व्यासपीठावर जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, नगरसेविका सौ. जयश्रीताई पाटील, भाजपच्या युवा नेत्या भैरवीताई पलांडे-वाघ, ॲड. व्ही. आर. पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य संदीप पाटील, पंचायत समितीचे माजी सभापती श्याम अहिरे, सौ. रेखाताई पाटील, नगरसेवक मोहन सातपुते, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत पाटील,डॉ. अनिल शिंदे, नगरसेविका सौ. स्वप्नाताई पाटील, विक्रांत पाटील, गटविकास अधिकारी एन. आर. पाटील, श्याम पाटील, जिजाबराव पाटील, योगेश महाजन, विजय राजपूत आदी.

# वृद्ध दाम्पत्याची मुलगी असल्याचा मला सार्थ अभिमान : खासदार स्मितताताई वाघ

## अमळनेर परिसरातील बाराशेवर नागरिकांना मिळाला जीवनोपयोगी साहित्याचा आधार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : केंद्र सरकारच्या राष्ट्रीय वयोश्री योजनेंतर्गत वृद्धांना मिळणारे जीवनोपयोगी साहित्य हे त्यांना जगण्याचा आधार देणारे आहे. वृद्ध माता-पित्यांच्या चेहऱ्यावरून आज ओसंडलेला आनंद हेच माझ्या कर्तृत्वाचे खरे सार्थक आहे. ज्या वयात मुला-सुनांची सर्वाधिक गरज असते त्या वयात जर कोणी जवळ नसेल, तर एकाकी आयुष्य किती दुःखद असू शकते, हे आपण सगळेच अनुभवू शकतो. कुठेतरी तुमची एक मुलगी होण्याचे भाग्य मला लाभले, हा माझ्यासाठी खरोखरच जीवनातील आनंदमय क्षण आहे, असे भावनिक उद्गार खासदार श्रीमती स्मिताताई वाघ यांनी काढले. केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारता मंत्रालय व ॲलिमको कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय वयोश्री योजनेतून अमळनेरसह परिसरातील वृद्ध नागरिकांना जीवनोपयोगी साहित्य वाटपप्रसंगी त्या बोलत होत्या. अमळनेर परिसरासह तालुक्यातील बाराशेवर वृद्धांना एक कोटी वीस लाखांचे १५ प्रकारचे जीवनोपयोगी साहित्य मोफत वाटप करण्यात आले.



अमळनेर : जीवनोपयोगी साहित्य वाटपप्रसंगी उपस्थित लाभार्थी.

जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, नगरसेविका सौ. जयश्रीताई पाटील, डॉ. अनिल शिंदे, भाजपच्या युवा नेत्या भैरवीताई पलांडे-वाघ, ॲड. व्ही. आर. पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य संदीप पाटील, पंचायत समितीचे माजी सभापती श्याम अहिरे, सौ. रेखाताई पाटील, नगरसेवक मोहन सातपुते, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत पाटील, नगरसेविका सौ. स्वप्नाताई पाटील, विक्रांत पाटील, गटविकास अधिकारी एन. आर. पाटील, श्याम पाटील, जिजाबराव पाटील, योगेश महाजन, विजय राजपूत आदींसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती.

खासदार वाघ म्हणाल्या, की वृद्धांनाही सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी व्हावेसे वाटते, गप्पा ऐकायला आवडते, विविध पदार्थ खावेसे वाटतात, त्यांनाही भावना आहेत. मात्र त्यांचे दात, कान, हात, पाय वृद्धापकाळात कमजोर होतात. त्यामुळे ते कृत्रिमरीत्या मजबूत होण्यासाठीचा हा प्रयत्न आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी करणवाल म्हणाल्या, की राज्यात वयोश्री योजनेची सुरूवात जळगाव जिल्ह्यातून प्रथम व ती अमळनेरमधून होत आहे, याचा मला विशेष आनंद आहे. खासदार स्मितताताईंच्या प्रयत्नांमुळे अमळनेर तालुक्यातील जास्तीत जास्त वृद्धांना याचा लाभ मिळाला आहे. नगरसेविका सौ. जयश्रीताई पाटील यांनी देखील महायुती शासनाच्या या उपक्रमाचे कौतुक करून ज्येष्ठ नागरिकांना आनंद देणारा हा प्रकल्प आहे, असे सांगितले. जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रप्रमुख एस. पी. गणेशकर यांनी ६० वर्षांवरील नागरिकांना शासनातर्फे चालायला व्हीलचेअर, शौचासाठी कमोड चेअर, ऐकायला कर्ण यंत्र, पाय, गुडघे, कमरेचे पट्टे, काठी, खायला दात, बघायला चष्मे असे १५ प्रकारचे साहित्य देण्यात येणार असल्याचे सांगितले.


यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात रामेश्वर येथील सौ. सुशीलाबाई पाटील, सौ. मथुराबाई पाटील, सौ. अलकाबाई पाटील, दरेगावच्या सौ. कमलाबाई चव्हाण, सौ. कल्पनाबाई जोशी, लोण येथील हरिश्चंद्र पाटील, भीमराव पाटील, बन्सीलाल पाटील, युवराज पाटील, विश्वनाथ पाटील यांना मान्यवरांच्या हस्ते साहित्य वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी ॲलिमको कंपनीचे किरण पावरा, दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे सदस्य मुकुंद गोसावी, राकेश पाटील, राहुल चौधरी, समाधान पाटील, अमोल पाटील, प्रवीण पाटील, तुळशीराम हटकर यांनी सहकार्य केले. संजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.



"वयोमानानुसार आता दिसण्याचे प्रमाण अतिशय कमी झाले आहे. या ठिकाणी आम्हाला एक वयश्री योजनेच्या माध्यमातून जे काही मिळाले ते खूप मोठे पाठबळ आहे. जणू काही आमच्या आई-वडिलांनीच ते दिले असल्याचे भावले. खूप आनंद झाला. हा एकप्रकारे जीवनातील महत्त्वपूर्ण आधार मिळाल्याचे मोठे समाधान आहे.

**– सौ. कमलबाई चव्हाण, हिंगोणा (लाभार्थी)**



"वयोश्री योजनेमार्फत आज आम्हाला जे येथे काही मिळाले त्यामुळे आमच्या जीवनाला एकप्रकारचा खूप मोठा आधार प्राप्त झाला आहे. मला गुडघे व कमरेचा अतिशय वेदनादायक त्रास आहे. आता मला हे आवश्यक साहित्य मिळाले. त्याच्या आधारावर मी चांगल्याप्रकारे चालू शकेल. त्यामुळे मी सर्वांना यासाठी धन्यवाद देतो.

**– बन्सीलाल देवराम पाटील, रामेश्वर (लाभार्थी)**

## दिनविशेष

२२ जानेवारी

- भारतीय घटनेची रूपरेषा कशी असावी याविषयीचा ठराव घटना समितीत मंजूर झाली.
- सर्व मित्र सिकरी यांनी भारताचे १३ वे सरन्यायाधीश म्हणून कार्यभार सांभाळला.
- आय. एन. एस. मुंबई ही क्षेपणास्त्रवाहू नौका भारतीय नौदलात दाखल झाली.
- उत्तर प्रदेशातील अयोध्या येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राम मंदिराचे भव्य उद्घाटन.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

## अमळनेरच्या दिनेश बागडे यांना राष्ट्रीय पॅरा पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रौप्यपदक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : उत्तराखंडमध्ये १६ ते १८ जानेवारी दरम्यान झालेल्या राष्ट्रीय पॅरा पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत अमळनेरचे दिनेश शशी बागडे यांनी उल्लेखनीय कामगिरी करत रौप्यपदक मिळविले.

ही स्पर्धा १०७ किलो वजनगटात पार पडली. या गटात देशभरातून एकूण २० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. अत्यंत चुरशीच्या आणि उच्च दर्जाच्या या स्पर्धेत बागडे यांनी १०७ किलो वजन उचलण्याची अफलातून कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. बागडे यांच्या या यशामुळे अमळनेरसह तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, क्रीडा प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे बागडे यांनी यापूर्वीही विविध राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून अनेक पारितोषिके व पदके पटकावली आहेत. ते सातत्याने आपल्या मेहनतीच्या जोरावर यशोशिखरे सर करत आहेत. त्यांच्या यशामागे असलेली अथक मेहनत, जिद्द, चिकाटी आणि क्रीडाप्रेम हे अनेक खेळाडूंसाठी प्रेरणादायक आहे.



## श्री मंगळग्रह मंदिरात दोन दिवस लाभणार विद्यार्थ्यांना बुद्धीच्या देवतांचा आशीर्वाद

### श्री गणेश जयंती, वसंत पंचमीनिमित्त आज, उद्या श्री विद्याविनायक याग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री मंगळग्रह मंदिरात दरवर्षीप्रमाणे गुरुवार, दि. २२ जानेवारी तसेच शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ रोजी श्री गणेश जयंती व वसंत पंचमीनिमित्त श्री विद्याविनायक यागाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ वाजता या यागाची सुरूवात होऊन सायंकाळी श्री मंगळग्रह देवांच्या महाआरतीने प्रथम दिवसाची सांगता होईल. यानिमित्ताने श्री मंगळग्रह मंदिरात दोन दिवस बुद्धीच्या देवतांचा भरभरून आशीर्वाद लाभणार आहे. त्यामुळे अमळनेर शहरातील शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आवर्जून या श्री विद्याविनायक यागाप्रसंगी सहभाग नोंदवावा, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे करण्यात आले आहे.


गुरुवार, दि. २२ जानेवारी रोजी श्री विद्याविनायक यागाचा प्रारंभ शिरीष डहाळे सर सपत्नीक करतील. यात ९ विद्यार्थ्यांचाही सहभाग राहील. यामध्ये गणपती पूजन आदी पंचांग कर्म, गणेशभद्र, गौरी तिलक, नवग्रह, रुद्र आदी विशिष्ट मंडलांची स्थापना केली जाईल. गणपती व सरस्वती देवींचे महाअभिषेक तसेच मोदक आणि पायस इत्यादी द्रवाने विशेष हवन करून बलिदान पूर्णाहुती करण्यात येईल.

शुक्रवार, दि. २३ जानेवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत ९ विद्यार्थिनींकडून सरस्वती देवींचे हवन करण्यात येईल. त्यानंतर आरती होऊन यागाची सांगता होईल.

श्री मंगळग्रह मंदिरात नियमित व्रत-वैकल्य, सण, उत्सवांवेळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात असते. त्यामुळे भाविकांनी या यागावेळीही उपस्थिती द्यावी.

### श्री विद्याविनायक यागाचा उद्देश

श्री विद्याविनायक यागाचा उद्देश म्हणजे युवापिढीचे होणारे अधःपतन थांबून त्यांना ऊर्जा व सत्मार्ग लाभावा, हा आहे. यासाठी श्री गणेश जन्मोत्सव व सरस्वती जन्मोत्सवाचे औचित्य साधून बुद्धिवर्धक स्तोत्राचे जसे गणपतीअथर्वशीर्ष स्तोत्राचे एक हजार आवर्तन करून श्री मंगलेश्वर गणेशजींना अभिषेक व एक हजार मोदकांचे हवन करण्यात येणार आहे. तसेच शुक्रवार, दि. २३ जानेवारी रोजी जी. एस. हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांकडून गणेशस्तोत्र व प्रज्ञाविवर्धनस्तोत्र यांचे पाठ करवून घेण्यात येणार आहे.



सोने, चांदीचा पुन्हा नवा रेकॉर्ड!
पान ३ वर

आनंदाचे, श्रद्धेचे आणि परंपरेचे पर्व
पान ४ वर



## निसर्ग मित्रमंडळाची पक्षी निरीक्षण भटकंती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील निसर्ग मित्रमंडळाने सातपुड्यातील शटलवर्थ घाटातून उगम पावणाऱ्या अनेर नदीतील स्थलांतरीत पक्षी निरीक्षणाची भटकंती आयोजित केली होती.

हिवाळ्याच्या सुरूवातीला तीन हजार किलोमीटर प्रवास करून हजारो पक्षी खानदेशातील दऱ्या-खोऱ्यांमध्ये, नद्यांच्या काठी वास्तव्याला येतात. त्यात प्रामुख्याने रशियन बदके, उंच पाय असलेले स्टिल्ट, अवाक, तुतवार, शिक्रा, कस्तूर, क्रेन, वेडा राघू, सातभाई हे पक्षी सातपुड्यात दिसले. फेब्रुवारी महिन्यात हिवाळा संपायला येतो तेव्हा या पक्ष्यांचा सातपुड्यातून परतीचा प्रवास सुरू होतो. अन्नाची उपलब्धता आणि उबदार हवामान

पान ३ वर



# ‘तू खूप चांगले काम केलेस...’

## आमिर खानकडून ‘या’ मराठी अभिनेत्रीचे कौतुक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मिथिला पालकर मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिला चित्रपटसृष्टीत नुकतीच १० वर्षे पूर्ण झाली. याच वर्षी तिला तिच्या आयुष्यातील सर्वांत मोठे प्रोजेक्ट मिळाले. १६ जानेवारी २०२६ रोजी तिचा ‘हॅप्पी पटेल’ हा आमिर खानची निर्मिती असलेला चित्रपट प्रदर्शित झाला. अशातच अभिनेत्रीने चित्रपटासाठी दिलेल्या ऑडिशनबद्दल आमिर खानची काय प्रतिक्रिया होती याबद्दल सांगितले आहे.

आमिर खानची निर्मिती असलेला आणि वीर दास व कवी शास्त्री यांनी दिग्दर्शन केलेला ‘हॅप्पी पटेल’ हा एक स्पाय रोमँटिक कॉमेडी चित्रपट आहे. त्यामध्ये वीर दास मुख्य भूमिकेत आहे, तर मिथिला पालकर महत्त्वपूर्ण भूमिकेत झळकत आहे. आमिर खानही या चित्रपटातून पाहायला मिळत आहे. स्क्रीनशी संवाद साधताना मिथिलाने तिला हा चित्रपट कसा मिळाला आणि येत्या काळात ती प्रियदर्शन यांच्या ‘भूत बंगला’ या चित्रपटातून झळकणार असल्याबद्दल तिने सांगितले आहे.

### मिथिला पालकरने सांगितला ऑडिशनचा किस्सा

‘हॅप्पी पटेल’ या चित्रपटाच्या ऑडिशनचा किस्सा सांगताना मिथिला म्हणाली, की नेहमीप्रमाणे चित्रपटांसाठी ऑडिशन देतो तशी ऑडिशन दिली. पण यावेळी थोडा फरक होता. कास्टिंग दिग्दर्शकाने माझ्याशी संपर्क साधला आणि मला माहिती देऊन सांगितले, की आम्ही ओळखीचे चेहरे असल्यामुळे आम्हाला थेट दिग्दर्शकांसमोरच ऑडिशन द्यायची आहे. मग झूम कॉलवर आम्ही रीडिंग केली आणि तेच माझे ऑडिशन होते. सर्व गोष्टी घडून आल्या.

### आमिर खानने केले मिथिलाचे कौतुक

मिथिलाला मुलाखतीत ऑडिशनच्या वेळी आमिर खान उपस्थित होता का, असे विचारल्यानंतर अभिनेत्री म्हणाली, की नाही. तेव्हा ते नव्हते. चित्रपटात माझा आमिर खान सरांबरोबर एकही सीन नाही. पण त्यांनी नंतर माझी ऑडिशन पाहिली आणि ते स्वतः सगळीकडे लक्ष देत होते. त्यामुळेच वीर आणि कवी यांना माझी ऑडिशन आवडल्यानंतरही मला थोडी भीती वाटत होती. माझ्या डोक्यात सतत त्यांना ही ऑडिशन आवडेल का हाच विचार होता. त्यांनी माझी ऑडिशन पाहिल्यानंतर आम्ही जेव्हा भेटलो तेव्हा ते म्हणाले, की तू चांगले काम केले आहेस आणि तुझे स्वागत आहे. आमिर सरांकडून कौतुक होणे ही मोठी गोष्ट आहे.

दरम्यान प्रियदर्शन दिग्दर्शित अक्षय कुमारची मुख्य भूमिका असलेल्या ‘भूत बंगला’ या चित्रपटात काम करण्याचा अनुभव सांगताना ती म्हणाली, की मी प्रियदर्शन सरांचे चित्रपट पाहत मोठी झाली आहे. अशा धाटणीच्या चित्रपटांमध्ये त्यांचा हातखंडा आहे. त्यात अक्षयकुमार सरांबरोबर काम करणे म्हणजे ही अजून एक जमेची बाजू आहे. ‘भूत बंगला’ या चित्रपटात अक्षय कुमारसह परेश रावलही महत्त्वपूर्ण भूमिकेतून झळकणार आहे. या चित्रपटातून मिथिला पालकर पहिल्यांदाच अक्षय कुमार व परेश रावल यांच्यासह मोठ्या पडद्यावर स्क्रीन शेअर करणार आहे.



# भारताची फुलराणी निवृत्त!

## म्हणाली, ‘...तेव्हा खेळणे थांबवायलाच हवे’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय दिग्गज बटमिंटन खेळाडू सायना नेहवाल हिने मोठा निर्णय घेतला आहे. तिने बॅडमिंटनमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. तिने निवृत्तीमागील कारणही सांगितले आहे. सायनाने सोशल मीडियावर पोस्ट न करता पॉडकास्टमध्ये सांगितले आहे.

सायनाने सांगितले, की तिच्या गुडघ्यामध्ये असलेल्या वेदनेमुळे तिच्यासाठी आता खेळणे शक्य नाही. तिने शेवटची स्पर्धा २०२३ मध्ये सिंगापूर ओपन खेळली. सायनाने २०१२ मध्ये ऑलिम्पिक पदक जिंकले होते.

पस्तीसवर्षीय सायनाने पॉडकास्टमध्ये सांगितले, की मी दोन वर्षांपूर्वीच खेळणे बंद केले आहे. मी माझ्या अटींवर खेळायला सुरूवात केली होती आणि माझ्या अटींवरच खेळणे सोडले आहे. त्यामुळे मला निवृत्तीची घोषणा करणे गरजेचे वाटले नाही.

सायनाच्या मते तिच्या गुडघ्यातील कार्टिलेज पूर्ण खराब झाले असून तिला संधिवात झाला आहे. ती म्हणाली, की जेव्हा तुम्ही खेळू शकत नाही तेव्हा तुम्ही थांबायला हवे. मी पहिल्या ८-९ तास सराव करायची, पण आता माझे गुडघे १-२ तासांतच उत्तर देऊन टाकतात. त्यानंतर सूज येते. त्यामुळे मी विचार केला की आता खूप झाले. मी माझी कारकीर्द आणखी ताणू शकत नाही.

सायना नेहवालला २०१६ ऑलिम्पिकदरम्यान झालेल्या गुडघ्याच्या दुखापतीमुळे मोठा फटका बसला होता. पण त्यानंतर तिने दमदार पुनरागमन कत २०१७ वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये कांस्य आणि २०१८ राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले होते. मात्र त्यानंतर तिला सातत्याने गुडघ्याच्या दुखापतीचा सामना करावा लागला होता. सायनाने २०२४ मध्येच जाहीरपणे तिला संधिवात असल्याचे सांगितले होते.

सायनाने जेव्हा २०१२ मध्ये ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते तेव्हा ती ऑलिम्पिक मेडल जिंकणारी भारताची पहिली बॅडमिंटन खेळाडू ठरली होती. तिने तीनवेळा ऑलिम्पिक स्पर्धा खेळली आहे. ती २००८ मध्ये जेव्हा वर्ल्ड ज्युनियर चॅम्पियनशिप जिंकली होती तेव्हा प्रकाशझोतात आली होती. त्यावर्षी ती पहिल्यांदा ऑलिम्पिक खेळली होती. २००९ मध्ये तिने बीडब्ल्यूएफ सुपर सिरीजही जिंकली. २०१० मध्ये तिने राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली होती. सायनाचा २००९ मध्ये अर्जुन पुरस्काराने आणि २०१० मध्ये राजीव गांधी खेलरत्न पुरस्काराने गौरव करण्यात आला आहे.



# सेक्युरिटी गार्ड कैसे बना प्रोडेक्शन हेड?

## सिर्फ सवाल पूछकर बदली किस्मत, किस्सा है जोरदार

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कई बार जिंदगी में बड़ा मोड़ किसी प्लान से नहीं, बल्कि सही समय पर पूछे गए एक सवाल से आ जाता है। मुंबई में ऐसा ही एक पल सामने आया, जब एक सिक्योरिटी गार्ड ने अपनी जिज्ञासा को दबाने के बजाय सामने रखा और उसी सवाल ने उसकी जिंदगी की दिशा बदल दी। अनिकेत काटकर मुंबई की एक अपार्टमेंट बिल्डिंग में सिक्योरिटी गार्ड की नौकरी कर रहे थे। एक दिन पार्किंग में उनकी मुलाकात डिजिटल क्रिएटर कुशल लोढ़ा से हुई। अनिकेत ने बिना झिझक उनसे बात की और बताया कि उन्हें वीडियो बनाना सीखना है। उन्होंने यह भी पूछा कि क्या वह कभी समय निकालकर उन्हें इस बारे में गाइड कर सकते हैं।



### कुशल लोढ़ा को अनिकेत में क्या खास नजर आया?

इस बातचीत के बाद दोनों अगले रविवार को मिले। कुशल लोढ़ा ने बाद में बताया कि अनिकेत की आंखों में सीखने की भूख साफ दिखाई दे रही थी। उसकी यही लगन देखकर लोढ़ा ने एक बड़ा फैसला लिया और अनिकेत को अपने सभी पॉडकास्ट शूट करने का मौका दे दिया। मौका मिलने के बाद अनिकेत ने पीछे मुड़कर नहीं देखा। उन्होंने खुद से वीडियो रिकॉर्डिंग सीखनी शुरू की। माइक्रोफोन को ऑडियो मिक्सर से कैसे जोड़ना है, साउंड क्वालिटी कैसे मेंटेन करनी है और शूट के दौरान किन बातों का ध्यान रखना है, यह सब उन्होंने मेहनत और प्रैक्टिस से सीखा।

### आज अनिकेत की भूमिका क्या है?

आज अनिकेत काटकर कुशल लोढ़ा के सभी पॉडकास्ट शूट्स की प्रोडक्शन टीम को लीड करते हैं। ऐसा कोई शूट नहीं होता, जिसमें वह मौजूद न हों। वह न सिर्फ टेक्निकल काम संभालते हैं, बल्कि गेस्ट्स से भी पूरे कॉन्फिडेंस के साथ बातचीत करते हैं। उनकी पहचान अब सिर्फ एक सिक्योरिटी गार्ड तक सीमित नहीं रही। कुशल लोढ़ा ने सोशल मीडिया पर यह पूरी जर्नी शेयर करते हुए बताया कि दो साल पहले जो व्यक्ति उनके बिल्डिंग का सिक्योरिटी गार्ड था, आज वही उनकी कंटेंट टीम की रीढ़ बन चुका है। यह पोस्ट देखते ही देखते लोगों के लिए प्रेरणा बन गई।

कुशल लोढ़ा का मानना है कि सफलता के लिए महंगी डिग्री या खास सर्टिफिकेट हमेशा जरूरी नहीं होते। अगर इंसान में सीखने की चाह और सही सोच हो, तो रास्ते खुद बनते चले जाते हैं। उनके मुताबिक, जिस दिन सीखने की इच्छा खत्म हो जाती है, उसी दिन इंसान की तरक्की भी रुक जाती है।

# ब्लूटूथ वारंवार का डिस्कनेक्ट होते?

## ‘या’ कारणांमुळे आपल्याला प्रॉब्लम तर येत नाही ना?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ब्लूटूथ कनेक्शन वारंवार ड्रॉप होत राहणे हा एक प्रॉब्लमच असतो. कारण यामुळे डिव्हाइस योग्यप्रकारे काम करू शकत नाही. यांना यूज करणे फ्रस्ट्रेटिंग होते. आपल्याला डिव्हाइस कनेक्ट करण्यासाठी लेबल आणि वायरची झंझट ठेवायची नसेल तर ब्लूटूथ सर्वांत जास्त कामाची गोष्ट आहे. ब्लूटूथच्या माध्यमातून आपण गाणे ऐकण्यापासून डेटा शेअर करणे आणि डिव्हाइस कंट्रोल करण्यापर्यंत अनेक कामे करू शकतो. याचा वापर खूप सोपा आहे. मात्र अनेकदा वेगवेगळ्या कारणांमुळे हे नीट काम करू शकत नाही. ब्लूटूथ वारंवार डिस्कनेक्ट का होते आणि यापासून बचावासाठी काय करावे?

### रेंजकडे लक्ष देणे गरजेचे

आपले ब्लूटूथ कनेक्शन वारंवार डिस्कनेक्ट होत असल्यास रेंजचा प्रॉब्लेम येऊ शकतो. आपण जुन्या स्पेसिफिकेशन्सचा ब्लूटूथ वापरत असाल, तर याची रेंज जवळपास ३३ फूट होते. यामुळे बाहेर गेल्यास कनेक्शन ड्रॉप होते. अनेकदा भींतीसारख्या फिजिकल ऑब्जेक्टमध्येच आल्याने रेंज कमी होते. यामुळे प्रयत्न करावा, की आपली होस्ट डिव्हाइसची रेंज बाहेर जाऊ नये.

### इंटरफेरेंस देखील समस्या निर्माण करू शकतो

फिजिकल ऑब्जेक्ट आणि डिस्टेंसव्यतिरिक्त इतर उपकरणांमधील हस्तक्षेपामुळे कनेक्शन तुटू शकते. ब्लूटूथ २.४ जीएचझेड फ्रिक्वेन्सी वापरते, जी इतर अनेक वायरलेस उपकरणांद्वारे देखील वापरली जाते. हे कधी-कधी मार्ग ब्लॉक करू शकते आणि आपले डिव्हाइस डिस्कनेक्ट होऊ शकते.

### सिंगल पॉइंट कनेक्शन

अनेक ब्लूटूथ डिव्हाइस एका वेळी फक्त एकाच डिव्हाइसशी कनेक्ट होऊ शकतात, तर काही प्राधान्य देतात. याचा अर्थ असा, की जर आपण एखाद्या डिव्हाइसजवळ आलात जे आधी कनेक्ट केलेले होते, तर ते मुख्य डिव्हाइसपासून डिस्कनेक्ट होऊ शकते आणि त्याच्याशी कनेक्ट होऊ शकते.

### बॅटरीने घडतो परिणाम

खूप कमी लोकांना हे माहिती असते, की डिव्हाइसची बॅटरी लाइफचाही ब्लूटूथ कनेक्शनवर परिणाम होतो. जर एखाद्या डिव्हाइसची बॅटरी लो असेल तर सिग्नल कमकुवत होते. ज्यामुळे ब्लूटूथ डिव्हाइस डिस्कनेक्ट होऊ शकते.



## हळदीपासून अगदी जायफळापर्यंत

# स्वयंपाकघरातील मसाला डब्यात आहे आरोग्याचे रक्षण करण्याची ताकद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्वयंपाकघरातील मसाल्यांचे अनोखे स्थान असते. मीठ जेवणाला चव, तर मसाला जेवणात तिखटपणा आणतो. हिंग पोटाची काळजी घेतो, तर हळद पदार्थाला चव देऊन जाते. हळद, जिरे, एका जातीची बडिशेप आणि आले यासारखे मसाले केवळ अन्नाची चव वाढवत नाही, तर आरोग्यासाठी औषध म्हणून देखील काम करतात. आजींच्या पारंपरिक उपायांपासून ते आजच्या आधुनिक जीवनशैलीपर्यंत मसाले नेहमीच भारतीय जेवणाचा अविभाज्य भाग राहिले आहेत. पण या मसाल्यांचे आरोग्यदायी फायदे आपणास माहिती आहेत का? ते जाणून घेऊया.

**हळद :** औषधी शास्त्रज्ञांच्या मते हळदीतील सक्रिय घटकांना करक्यूमिन असे म्हणतात. यामुळे स्मरणशक्ती सुधारण्यास, मेंदूतील जळजळ कमी होण्यास आणि विशिष्ट प्रकारच्या कर्करोगापासून संरक्षण करण्यास मदत होऊ शकते. संधिवात असलेल्या लोकांमध्ये वेदना, जळजळ कमी करण्यासाठी करक्यूमिन देखील प्रभावी मानले जाते. शिवाय हळद चांगले कोलेस्ट्रॉल (एचडीएल) वाढविण्यास आणि वाईट कोलेस्ट्रॉल (एलडीएल) कमी करण्यास मदत करतात. जे हृदयाच्या आरोग्यास चांगले योगदान देते. शिवाय हळदीतील करक्यूमिन रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास आणि सांधे मजबूत करण्यास मदत करतात. प्राचीन काळापासून जखमा, सर्दी, खोकला, पोटाच्या समस्यांसाठी हळदीचा वापर केला जात आहे. तसेच हळदीचे दूध अजूनही एक विश्वासार्ह घरगुती उपाय मानले जाते.

**जिरे, बडिशेप आणि वेलची :** आरोग्यतज्ज्ञांच्या मते जिरे, बडिशेप आणि वेलची जवळजवळ प्रत्येक भारतीय स्वयंपाकघरात आढळतात आणि पचनासाठी खूप फायदेशीर असतात. जिरे चयापचय गतिमान करते, पोट हलके ठेवते. बडिशेप शरीराला थंड करते आणि तोंडाची दुर्गंधी दूर दूर करण्यास मदत करते. वेलची शरीराला विषमुक्त करते आणि मन शांत करते. त्यामुळे हे तिन्ही मसाले चहा, काढा आणि जेवणानंतर माऊथ फ्रेशनर म्हणून आवर्जून वापरले जाते.

**आले, काळी मिरी आणि लवंग :** हवामान बदलत असताना सर्दी आणि संसर्गाचा धोका वाढतो. आले, काळी मिरी, लवंग हे अत्यंत उपयुक्त मसाले आहेत. हे मसाले शरीराला उबदार ठेवतात. रक्ताभिसरण सुधारतात, रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. एनसीबीआयच्या मते आले मळमळ कमी करते आणि घशाला आराम देते. काळी मिरी शरीराला अन्नातील पोषक तत्त्वे चांगल्याप्रकारे शोषण्यास मदत करते. लवंगमध्ये अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात. जे दातदुखी आणि तोंडाच्या समस्यांपासून आराम देतात.

**दालचिनी आणि जायफळ :** दालचिनी आणि जायफळ असे मसाले आहेत. जे अन्नाला सुगंध, उबदारपणा आणि आरामदायी स्पर्श देतात. दालचिनी रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करते, हृदयाचे आरोग्य सुधारते. जायफळाचे सेवन कमी प्रमाणात केल्यास पचन सुधारते आणि चांगली झोप लागते. हिवाळ्यात हे मसाले विशेषतः मिठाई आणि विशेष पेयांमध्ये आवर्जून वापरले जातात. मसाल्यांचा योग्य वापर आवश्यक आहे. जरी मसाले आरोग्यासाठी फायदेशीर असले तरी ते मर्यादित प्रमाणात वापरावेत. जास्त मसाले खाल्ल्याने पोटाच्या समस्या देखील उद्भवू शकतात. आरोग्यतज्ज्ञांच्या मते चव आणि आरोग्य दोन्ही राखण्यासाठी मसाल्यांचा आपण दैनंदिन आहारात योग्यरित्या समावेश करावा.

भारतीय मसाले हे केवळ स्वयंपाकासाठी उपयुक्त नसून आपल्या आरोग्याचे रक्षक देखील आहेत. हळदीपासून दालचिनीपर्यंत प्रत्येक मसाल्याची स्वतःची वेगळ ओळख आहे. जर आपल्या आहारात योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने समाविष्ट केले तर शरीराला बळकटी देऊ शकतात, मन शांत करू शकतात आणि निरोगी जीवन जगू शकतात. म्हणूनच भारतीय मसाले जगभरात एक विशेष स्थान धारण करत आहेत.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# विद्यार्थी सहलीचा बेत आखताय; प्रवास भाड्यात मिळणार ५० टक्के सवलत

## ‘एसटी’ने आणली शाळांसाठी अभिनव योजना : पर्यटन, देवदर्शनासाठीही सुविधा लागू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने शालेय सहलींसाठी शाळांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमधून प्रवास बंधनकारक करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने विद्यार्थी सहलींसाठी प्रवास भाड्यात ५० टक्के सवलतीची योजना जाहीर केली आहे. या योजनेंतर्गत शालेय सहलीबरोबरच देवदर्शन, पर्यटनासाठी ग्रुप बुकिंगच्या माध्यमातूनही प्रवाशांना प्रवासाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे सध्या राज्यातील प्रवाशांकडून या योजनांचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला जात असल्याचे चित्र दिसून येत आहे.

हिवाळ्यात कडाक्याची थंडी असली, तरी पावसाळा आणि उन्हाळ्याच्या तुलनेत हा ऋतू सर्वांनाच हवाहवासा वाटतो. या काळात बहुतांश प्रवासी कुटुंब, मित्र परिवारासह देवदर्शन, पर्यटनासाठी जाण्याचा बेत आखतात. तसेच बहुतांश शाळांकडूनही याच काळात सहलींचे नियोजन केले जाते. दरम्यान, शासकीय, निमशासकीय आणि खासगी शाळांना सहलीबाबत राज्य शासनाने काही नियमही आखून दिले आहेत. ते पाळणे सर्वच शाळांना बंधनकारक आहे.

**दहा लाखांपर्यंतचा अपघात विमा**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ शालेय सहलींसाठी नवीन बस उपलब्ध करून देत आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी भाड्यात ५० टक्के सवलत देत आहे. विद्यार्थी सहली परवडणाऱ्या आणि सुरक्षित व्हाव्यात, यासाठी ही तरतूद करण्यात आल्याचे सांगितले जाते. यामध्ये सहलीला जाणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला काही अप्रिय घटना घडल्यास १० लाखांपर्यंतचा अपघात विम्याचाही लाभ दिला जातो.

**बसची बुकिंग कशी करणार?**

सहलीसाठी बसची बुकिंग करण्यासाठी शाळांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या स्थानिक आगार व्यवस्थापकांशी संपर्क साधावा. त्यानंतर संबंधित आगार व्यवस्थापक शाळांच्या मुख्याध्यापकांशी चर्चा करून सहलींचे नियोजन करतील. त्यानुसार सहलीसाठी बसची बुकिंग होऊन प्रवास करता येतो.

### प्रवास भाड्यात सवलतीची योजना

आजपर्यंत सहलीदरम्यान अनेक अघटित घटना घडल्या आहेत. त्यामुळे आता विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने शाळांना सहलीसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधूनच प्रवास करावा, असे आदेश दिले आहेत. विशेष म्हणजे यासाठी प्रवास भाड्यात ५० टक्के सवलतीची योजनाही लागू केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांवर सहलीच्या खर्चाचा भार कमी येऊन सुरक्षित प्रवासाची हमीदेखील मिळते. यात विद्यार्थ्यांना पर्यटनही करता येणार आहे. मात्र, ही सवलत केवळ महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांसाठीच लागू आहे.




# ध्येयनिश्चिती, प्रामाणिक प्रयत्न व आत्मविश्वास हीच यशस्वीतेची त्रिसूत्री : प्राचार्य डॉ. सोनवणे

## खा. शि. मंडळाच्या फार्मसी महाविद्यालयात नवीन विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : स्वामी विवेकानंद, डॉ. एपीजे अब्दुल कलाम व रतनजी टाटा यांनी जीवनात ध्येयनिश्चिती, प्रामाणिक प्रयत्न व आत्मविश्वास या त्रिसूत्रींचा अवलंब केला. त्यामुळेच ते जीवनात यशस्वी झाले. हीच त्रिसूत्री आपणही अंगीकारल्यास जीवनात नक्की यशस्वी व्हाल, असा सल्ला प्राचार्य डॉ. रवींद्र सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना दिला.




*अमळनेर : खा. शि. मंडळाच्या फार्मसी महाविद्यालयात नुकताच नवीन विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमही झाला. यात यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य डॉ. रवींद्र सोनवणे व प्राध्यापक.*

खान्देश शिक्षण मंडळ संचलित स्व. पं. छ. भांडारकर व र. का. केले औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) महाविद्यालयात नुकताच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पदविका व पदवी अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ‘RxVibez-२०२६’ हा स्वागत सोहळा आयोजित करण्यात आला, त्यात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

फार्मसी महाविद्यालयातील प्रा. अनिल बोरसे, प्रा. देवेश भावसार, प्रा. छाया महाजन, प्रा. शिवानी शर्मा व द्वितीय वर्षातील सर्व विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमात प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कार सादर करीत आपला परिचय करून दिला. याप्रसंगी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये घेण्यात आलेल्या वार्षिक परीक्षेत प्रथम आलेले, जी-पॅट स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झालेले तसेच विविध क्रीडा स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमावेळी बऱ्याच विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपल्यातील कला सादर केल्या. उत्तम सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. माळी यांच्या हस्ते मुकुट प्रदान करण्यात आले. यावेळी संस्थेचे नवनिर्वाचित चेअरमन सीए नीरज अग्रवाल, व्हा. चेअरमन जितेंद्र जैन, ज्येष्ठ संचालक योगेश मुंदडे, सचिव प्रा. पराग पाटील व पदाधिकाऱ्यांनी फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून अशा प्रकारचे कार्यक्रम भविष्यातही आयोजित करून खा. शि. मंडळ व फार्मसी महाविद्यालयाची सांस्कृतिक व शैक्षणिक परंपरा सतत जोपासावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्रा. अनिल बोरसे, प्रा. देवेश भावसार, प्रा. छाया महाजन, प्रा. शिवानी शर्मा, प्रा. हर्षदा पवार, प्रा. मानसी उपासनी, प्रा. प्रियांका महाजन, प्रा. वैशाली कुळकर्णी, प्रा. गीतांजली पाटील, प्रा. प्रगती पाटील, प्रा. स्वप्नाली महाजन, प्रा. सतीश ब्राह्मणे, प्रा. प्रफुल चव्हाण, प्रा. प्रीतम पाटील, कार्यालय अधीक्षक अनिल महाजन व सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या स्वागत सोहळ्यासह सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वितेसाठी सहकार्य केले. प्रा. शिवानी शर्मा, द्वितीय वर्षाचे विद्यार्थी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. छाया महाजन यांनी आभार मानले. ‘वन्दे मातरम्’ने कार्यक्रमाची सांगता झाली.

## निसर्ग मित्रमंडळाची पक्षी निरीक्षण भटकंती

**पान १ वरून**

या अनुकूल परिस्थितीमुळे पक्षी खानदेशात येतात, चार महिने राहतात, पिलांना जन्म देतात व माघारी जातात. हे चक्र वर्षानुवर्षे सुरू आहे. देवझिरीच्या जंगलात साग, सलई, बांबू, धावडा, सादडा, मोह, हिरडा, अंजन वृक्ष आजही लाखोंच्या संख्येने उभे आहेत. पानझड सुरू झालेली दिसली. मोह, सादडा, हळदूचा मोहर दिसू लागला होता. डिंक गोळा करण्याचे काम सुरू झाले होते. या जंगल भटकंतीमध्ये दिलीप सोनवणे, शीतल देशमुख, चंद्रकात भदाणे, प्रा. भराटे, उमेश वाल्हे, निलेश लांडगे, रवी पाटील, प्रा. प्रकाश धर्माधिकारी यांनी भाग घेतला.

## सोने, चांदीचा पुन्हा नवा रेकॉर्ड!

### जळगावात दरवाढीच्या भीतीने ग्राहकांसह व्यवसायिकांमध्ये खळबळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगावातील सुवर्ण बाजारपेठेत गेल्या काही दिवसांपासून सातत्याने नवीन उच्चांक करणाऱ्या सोने आणि चांदीच्या दराने बुधवार, दि. २१ जानेवारी रोजी आणखी नवा रेकॉर्ड केला. सकाळी बाजार उघडल्यावर सोन्याच्या दरात ७,८०० रुपयांची वाढ नोंदविली गेली. त्यामुळे सोन्याने जीएसटीसह प्रति १० ग्रॅम १ लाख ६० हजार ६८० रुपये दराचा नवीन उच्चांक केला. तर चांदीच्या दरात ५ हजार १५० रुपयांची वाढ नोंदविली गेली त्यामुळे चांदी जीएसटीसह प्रतिकिलो ३ लाख ३४ हजार ७५० रुपये या ऐतिहासिक उच्चांकापर्यंत पोहोचली. त्यामुळे ग्राहकांसह व्यावसायिकांत खळबळ उडाली.

# पोलीस स्टेशनमध्ये जावे लागते आहे काय?

## मग खालील माहिती जरूर वाचा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय लोकशाहीत पोलीस यंत्रणा हा समाजातील कायदा व सुव्यवस्थेचा आधारस्तंभ आहे. मात्र आजही सामान्य नागरिक पोलीस स्टेशनची पायरी चढताना द्विधा मनःस्थितीत असतो. याचे मुख्य कारण म्हणजे कायद्याचे अज्ञान आणि यंत्रणेबद्दल मनात असलेली अनाठायी भीती. परंतु आपल्या संविधानाने आणि सर्वोच्च न्यायालयाने सामान्य नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी अत्यंत प्रबळ कवचकुंडल दिली आहेत.



न्याय मिळविण्याची पहिली पायरी म्हणजे तक्रार नोंदविणे. ‘ललिता कुमारी विरुद्ध उत्तर प्रदेश’ या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे, की जर तक्रारीतून दखलपात्र गुन्हा घडल्याचे दिसून येत असेल, तर ‘एफआयआर’ नोंदविणे पोलिसांना अनिवार्य आहे. अनेकदा ‘आमच्या हद्दीतील प्रकरण नाही’ असे सांगून तक्रार टाळली जाते. मात्र अशा वेळी ‘झीरो एफआयआर’च्या माध्यमातून तुम्ही कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवू शकता. २०२६ च्या नवीन कायद्यानुसार (बीएनएसएस), जर पोलीस तक्रार नोंदवत नसतील, तर तुम्ही ती लेखी स्वरूपात पोलीस अधीक्षकांना पाठवू शकता किंवा त्यानंतर थेट मॅजिस्ट्रेट कोर्टात खासगी तक्रार दाखल करून पोलिसांना गुन्हा नोंदविण्याचे न्यायालयाद्वारे आदेश देऊ शकता.

अटक हा कोणत्याही व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारा विषय असल्याने सर्वोच्च न्यायालयाने ‘डी. के. बसू विरुद्ध पश्चिम बंगाल’ खटल्यात ११ कठोर मार्गदर्शक तत्त्वे आखून दिली आहेत. यानुसार आरोपीला अटक करताना पोलिसांना स्वतःच्या नावाचा बिल्ला असणे, अटकेची कारणे, वेळ आणि दिनांक असलेला ‘अरेस्ट मेमो’ तयार करणे आणि अटक केलेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांना तत्काळ माहिती देणे बंधनकारक आहे. विशेष म्हणजे नोव्हेंबर २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ‘मिहीर राजेश शाह विरुद्ध महाराष्ट्र राज्य’ खटल्यात स्पष्ट केले, की अटकेचे कारण केवळ तोंडी सांगून चालणार नाही, तर ते लेखी स्वरूपात आणि आरोपीला समजेल अशा भाषेत देणे अनिवार्य आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ‘अर्णेश कुमार विरुद्ध बिहार’ आणि ‘सत्येंद्र कुमार अंतिल’ या निकालांद्वारे पोलिसांच्या अटकेच्या अधिकारावर मर्यादा आणल्या आहेत. ज्या गुन्ह्यांमध्ये ७ वर्षांपेक्षा कमी शिक्षा आहे तेथे पोलीस थेट अटक करू शकत नाहीत. त्यांना आधी ‘कलम ३५ (३) बीएनएसएस’ (पूर्वीचे ४१-ए) नुसार चौकशीची नोटीस देणे अनिवार्य आहे. याला काही अपवादही आहेत. परंतु केवळ संशय आहे म्हणून कोणालाही कोठडीत टाकणे आता बेकायदेशीर ठरते; अटकेची ठोस गरज पोलिसांना दंडाधिकाऱ्यांसमोर सिद्ध करावी लागते.

**महिलांचे अधिकार आणि मानवी हक्क**

महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायदा अत्यंत संवेदनशील आहे. ‘शीला बर्से विरुद्ध महाराष्ट्र राज्य’ या निकालानुसार कोणत्याही महिलेला सूर्यास्तानंतर आणि सूर्योदयापूर्वी अटक करता येत नाही. महिलेला अटक करताना महिला पोलीस कर्मचाऱ्याची उपस्थिती अनिवार्य असून तिची झडतीही महिला पोलीसच घेऊ शकतात. तसेच अटकेनंतर २४ तासांच्या आत आरोपीला न्यायालयासमोर हजर करणे हे पोलिसांचे घटनात्मक कर्तव्य आहे. कोठडीतील छळ रोखण्यासाठी, अटकेच्या वेळी स्वतःची वैद्यकीय तपासणी करून घेण्याचा आणि चौकशीदरम्यान आपल्या पसंतीच्या वकिलाचा सल्ला घेण्याचा (कलम ४१-डी) अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे.

– **ॲड. सारांश सोनार** (कायदे अभ्यासक, वक्ता)

### नवीन सुधारणा: व्हिडिओ रेकॉर्डिंग आणि पारदर्शकता

नवीन ‘भारतीय नागरिक सुरक्षा संहिता’ (बीएनएसएस) आणि ‘साक्ष अधिनियम’ (बीएसए) मुळे पोलीस प्रक्रियेत मोठी पारदर्शकता आली आहे. आता कोणत्याही झडती (सर्च) किंवा जप्तीवेळी (सैझूर) त्याचे व्हिडिओ चित्रीकरण करणे पोलिसांना बंधनकारक आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून आता ‘ई-एफआयआर’ची सुविधाही उपलब्ध झाली आहे. जर एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने जाणीवपूर्वक आपले कर्तव्य करण्याचे नाकारले किंवा सत्तेचा गैरवापर केला, तर त्यांच्याविरुद्ध ‘पोलीस तक्रार प्राधिकरणाकडे’ किंवा वरिष्ठ पातळीवर कठोर कारवाईच्या तरतुदी कायद्यात आहेत. न्यायप्रक्रिया आणि पोलीस प्रशासन हे दडपशाहीचे साधन नसून जनतेच्या सेवेसाठी असलेले लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत, हे समजून घेणे आजच्या काळाची गरज आहे. ‘प्रकाश सिंग विरुद्ध भारत सरकार’ या ऐतिहासिक खटल्याने हेच अधोरेखित केले आहे, की पोलीस सुधारणा आणि पारदर्शक न्यायव्यवस्था केवळ जागरूक नागरिकांच्या सहभागामुळेच शक्य आहे. कायद्याचा धाक गुन्हेगारांना असावा, प्रामाणिक नागरिकांना नाही; आणि जेव्हा आपण आपले अधिकार व सर्वोच्च न्यायालयाने दिलेले संरक्षण निर्भयपणे वापरायला शिकू, तेव्हाच लोकशाही खऱ्या अर्थाने यशस्वी होईल. लक्षात ठेवा, सजगता हेच अन्यायाविरुद्धचे सर्वांत मोठे शस्त्र आहे.

# साहसी युवकासाठी नॅशनल हिमालयन ट्रेकिंग प्रोग्रॅम सुवर्णसंधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**भारताच्या उत्तरेला उभा असलेला उंच हिमालय सौंदर्याने नटलेला आहे. जगभरातील पर्यटक हिमालय पाहण्यासाठी येतात. काही धाडसी युवक गिरीभ्रमणासाठी येतात. पदभ्रमण करून हिमालयाचे सुळके, वृक्ष, बर्फाच्छादीत शिखरे अल्प खर्चात पाहण्याची संधी यूथ होस्टेल्स असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेने उपलब्ध करून दिली आहे. ही संस्था मे महिन्यात हिमालयन ट्रेकिंग कार्यक्रम आयोजित करते.**



### उद्देश

युवकांच्या साहसी वृत्तीला चालना मिळावी, धासी छंदाची जोपासना व्हावी, बर्फाळ प्रदेशातून पदभ्रमणाची हौस पूर्ण व्हावी हा यूथ होस्टेल्स असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेचा उद्देश आहे. या कार्यक्रमात ३००० फूट उंचीपासून तर ११००० फूट उंचीपर्यंत गिरीभ्रमण आयोजित केले जाते. पायी चालताना, डोंगर चढताना निसर्गाचे विलोभनीय दर्शन घडते. हिमालयाची शांत, रौद्र, उदात्त रूपे बघायला मिळतात. आपल्या डोंगर-दऱ्या व नद्यांविषयी आपुलकीची भावना तयार होते. भारतातील विविध धर्म, पंथ, वर्ण, वंश, भाषेचे युवक एकत्र राहतात. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेची ज्योत प्रज्वलित होते.

### निसर्गरम्य भ्रमण

गिरीभ्रमणाचा मार्ग हिमाचल प्रदेशातील कुलू, मनाली व पार्वती व्हॅलीच्या दऱ्या-खोऱ्यांतून जातो. या मार्गात विविध रंगांची फुले, वृक्ष, पक्षी दिसतात. अक्रोड आणि सफरचंदाच्या बागा लागतात. अक्रोडचे पीक आपल्याकडील बोरांइतके विपूल प्रमाणात होते. पाईन, देवदार वृक्षाइतके उंच की जणू आकाशाला टेकलेले वाटतात. मणिकरणला उष्ण पाण्याचे झरे आणि पवित्र गुरुद्वारा उभा आहे. खळखळणारी पार्वती नदी उगम पावून खाली येते. तिच्या एका काठावर बर्फ, तर दुसऱ्या काठावर उकळणाऱ्या पाण्याचे झरे. यात भांडी ठेवून भात शिजतो. डोंगरावर बर्फांच्या राशी पडलेल्या असतात. निसर्गसौंदर्याचा आनंद लुटता-लुटता संकटांवर मात करण्याची मानसिकता तयार होते. बर्फातून चालताना ‘साद देती हिम शिखरे’ मनात रुंजी घालते. बर्फातील घसरगुंडी प्रत्येक युवकाने केलीच पाहिजे. येथे राष्ट्रीय चारित्र्य आणि कणखरपणा याची जडणघडण होते.

### ट्रेकिंग चालू असताना

चालताना बिस्कीट, चॉकलेटचे वेष्टन टाकले जातात. त्यामुळे मागून येणाऱ्यांना रस्ता, दिशा कळते. हे सगळे हसत-खेळत, रमतगमत पूर्ण करायचे असते. एक हजार फुटांवरून पाच हजार चढताना दम लागतो, बर्फात घाम फुटतो. मग दहा मिनिटे विश्रांती. पंधरा दिवसांत अंघोळ जवळजवळ नाहीच. कारण पाण्याचे तापमान २ ते ४ से. असे करत-करत पुढील कॅम्पवर ग्रुप लिडर स्वगत करतो. उष्ण एक-एक लिटर चहा देतो. रात्री तंबूत राहायचे. बाहेर अस्वलांची वस्ती असते. अस्वले अक्रोड खायला रात्री जंगलात बाहेर पडतात. त्यामुळे रात्री नंबर वन-टूसाठी बाहेर पडताना ग्रुप लिडर मदत खरतात.

घट्ट ट्राऊझर, जाड शर्ट, स्वेटर, कानटोपी आणि पायात जंगल बूट, हंटर बूट.पाठीवर रकसॅक. हातात काठी. हंटर बूट घालूनच झोपायचे. एका तंबूत ४६ व्यक्ती असतात. तंबूत अंथरायला दोन गरम ब्लँकेट व पांघरायला दोन जाड ब्लँकेट. कसोलजवळ उष्ण पाण्याचे झरे लागतात. तेथे अंघोळ करता येते. पहाटे भरपूर चहा, नाश्ता मिळतो. मार्गात खाण्यासाठी उसळ, पुरी भाजी देतात. कॅम्प लिडर विनामानधन काम करतात. नव्या ग्रुपचे स्वागत व जुन्या ग्रुपला प्रेमळ निरोप दिला जातो. रात्री आठ वाजता शेकोटीचा कॅम्पफायरचा कार्यक्रम असतो.

### कसे चालते ट्रेकिंग?

**गिरीभ्रमणाचा कार्यक्रम १० ते १५ दिवसांचा असतो. हिमाचल प्रदेशातील बियास नदीकाठी सगळे दाखल झाले, की ओळख करून दिली जाते. ओळखपत्र दिले जाते. दुसऱ्या दिवशी सराव कार्यक्रमात डोंगर चढणे व उतरणे, नदी ओलांडणे शिकविले जाते. श्वसनाचे व्यायाम दिले जातात. तिसऱ्या किंवा चौथ्या दिवसापासून प्रत्यक्ष गिरीभ्रमण सुरू होते. रोज ६ तास ते ९ तास चालावे लागते. यात ७ कि.मी. ते १५ कि.मी. वाटचाल असून त्यात तीन हजार ते सात हजार फूट चढाव उतार असतो. यूथ होस्टेल्स असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेचे गिरीभ्रमण लोकप्रिय आहे. ५ मे ते १० जून या कालखंडात गिरीभ्रमण आयोजित होत असते.**

### आवश्यक सामान

डोंगराळ भागातून चालताना पाठीवरच्या रकसॅकमध्ये बसेल एवढे साहित्य बरोबर घ्यायचे असते. त्यात वूलनचे तीन सेट, कानटोपी, हंटर शूज, सहा पायमोजे, हातमोजे, सनकॅप, सनगॉगल, एक मग, चमचा, वॉटर बॉटल, टूथब्रश, पेस्ट, साबण इत्यादी बरोबर घ्यावे.

### प्रवेश कोणाला?

यूथ होस्टेल असोसिएशन ऑफ इंडियाचे प्रमुख कार्यालय ५ न्याय मार्ग, चाणक्यपुरी, नवी दिल्ली ११००२१ येथे आहे. येथे सभासद अर्ज व ट्रेकिंग फॉर्म उपलब्ध असतो. धडधाकट व साहसी व्यक्तींना ट्रेकिंगमध्ये प्रवेश आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना विशेष रजा मिळते. रेल्वे प्रवासात पाव हिस्सा तिकिटात सवलत आहे. आजही मला हिमालय शिखरे साद देतात, तेथील वृक्ष, झरे, प्राणी, पक्षी माघारी बोलवितात.

– **लेखक**
**प्रा. प्रकाश धर्माधिकारी**

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# श्री गणेश जयंती विशेष

# आनंदाचे, श्रद्धेचे आणि परंपरेचे पर्व



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय संस्कृतीत देवपूजनाचे व त्यातील उत्सवांचे विशेष महत्त्व आहे. गणपती बाप्पा म्हणजे विघ्नहर्ता, बुद्धीचा आणि शुभारंभाच्या देवतांचा जन्मोत्सव अर्थात श्री गणेश जयंती ही आपल्या लोकमानसाने अत्यंत आदराने आणि भक्तीने साजरा केला जाणारा सण आहे. हा सण फक्त धार्मिक उत्सव नसून संस्कृती, परंपरा, सामाजिक ऐक्य आणि नवचैतन्याचा साक्षात अनुभव आहे.

### १) श्री गणेश जयंती कधी आणि काय कारणाने साजरी?

श्री गणेश जयंती ही प्रत्येक वर्षी श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षाच्या चतुर्थीला साजरी केली जाते. हा दिवस गणपती बाप्पांच्या जन्मदिनाचा उत्सव मानला जातो. लोकांच्या मनात त्यांच्या कृपेची, विद्या-वैभवाची आणि विघ्नहरण्याची प्रार्थना करण्यासाठी हा दिवस अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

### २) पौराणिक कथानुसार श्री गणेश यांची उत्पत्ती

परंपरेनुसार देवी पार्वती यांनी स्वतःच्या शरीराच्या पुसणाऱ्या कापडांपासून एक सुंदर मुलाला निर्माण केले. या बाळाला गणेश नाव देण्यात आले आणि तो पार्वतीचा द्वाररक्षक म्हणून राहिला. जेव्हा भगवान शिव परत आले, तर त्यांना त्यांच्यामागे ठेवलेल्या मुलाचा परिचय नव्हता. त्या नवजात मुलाने प्रवेश न देणे ही घटना घडली. रागाच्या आघाताने भगवान शिव यांनी त्या बाळाचे शिराप्रहार करून मृत्यू होताच त्याचे पुनरुज्जीवन करण्यासाठी श्रीमहारुद्रांनी हत्तीचे नेत्र, देव-देव यंत्रणा आणि जीवनप्राण उभारणे अशा दिव्य विधींनी त्याचा पुनर्जन्म केला. तेव्हापासून त्या दिवशीचे स्मरण करून त्याचा जन्मदिन म्हणून श्री गणेश जयंती उत्सवात साजरा केला जातो.

### ३) उत्सवाची वैशिष्ट्ये पूजा-विधी व समारंभ

श्री गणेश जयंतीला घराघरांत गणपती बाप्पांची स्थापना केली जाते.

* मोदक, लाडू, पुडिंदा इत्यादी विशेष नैवेद्य देवाला अर्पण केले जातात.
* श्रीगणेशा मंत्र, ॐ श्रीगणेशाय नमः, वक्रतुंड महाकाय यांसारखे स्तोत्र आणि आरती गायिली जातात.
* सकाळ-सायंकाळी भक्तिगीत, भजन-कीर्तन, धार्मिक प्रवचन आयोजित केली जातात.

समाजातील सहभाग

फार मोठ्या प्रमाणावर लोक उत्सवात सहभागी होतात. शाळा, मंदिर, मंडळे, सांस्कृतिक संस्था यात विविध कार्यक्रम रचतात.

* नृत्य
* संगीत
* नाट्य
* चित्रकला
* वक्तृत्व स्पर्धा

या कार्यक्रमातून लोकांमध्ये श्रीगणेशभक्तीचे आणि संस्कृतीचे जतन होत राहते.

### ४) सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व

एकात्मतेचा संदेश

श्री गणेश जयंती सामाजिक समभाव, सहिष्णुता आणि ऐक्य यांचा संदेश देते. विविध धर्म, जाती, समुदायांचे लोक एकत्र येऊन सण साजरा करतात. ज्यामुळे समाजातील एकात्मता दृढ होते.

शिक्षण आणि बुद्धीचे प्रतीक

श्री गणेशजी विद्या आणि बुद्धीचे देव म्हणून पूजले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिका, जाणून घ्या, मनन करा अशा गुणांनाही हा उत्सव प्रोत्साहन देतो.

### ५) आधुनिक काळातील श्री गणेश जयंती

आजच्या काळातही श्री गणेश जयंती हा सण पारंपरिक विधी तसेच नवीन रूपांमध्येही साजरा होतो.

* डिजिटल आरती
* ऑनलाइन भजन
* कोरोना काळानंतरही सुरक्षित सामाजिक आयोजन

या माध्यमातून लोक जोडलेले आहेत.

यासोबतच पर्यावरणपूरक गणपती, जैविक विघ्नहर्ता प्रतिमा, नैसर्गिक रंगाचे गणपती हे पर्यावरण-जागरूक सण बनत चालले आहे.

**६)** श्री गणेश जयंती हे आपल्या जीवनात शुभारंभाचे, सकारात्मक ऊर्जा देणारे आणि सांस्कृतिक वारसा जपणारे अनमोल पर्व आहे. आपली श्रद्धा, भक्ती, आणि निष्ठा या सणामुळे समाजात आनंद, सौहार्द, शिक्षण आणि संस्कृतीची गोडी वाढते.

# गुरुचरित्रात उलगडलेली काशी...



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गुरुचरित्रात काशी क्षेत्र हळूहळू उलगडत जाते परीक्षेच्या, तपश्चर्येच्या, संन्यासाच्या आणि अखेरीस मुक्तीच्या सूक्ष्म संकेतांमधून. काशी येथे केवळ भौगोलिक स्थान म्हणून येत नाही, तर साधकाच्या अंतरात्म्याच्या प्रवासाचा महत्त्वाचा टप्पा म्हणून ती प्रकट होते.

गुरुचरित्राच्या दुसऱ्या अध्यायात काशी क्षेत्राचा पहिल्यांदा उल्लेख येतो. तोच या क्षेत्राचे स्वरूप स्पष्ट करतो. अंगिरस ऋषी आपल्या जीवनातील उर्वरित पापभोग भोगण्यासाठी काशीला जातात. हा प्रसंग महत्त्वाचा आहे. कारण येथे काशी ही केवळ पुण्यसंचयाची जागा नसून कर्मशुद्धीचे क्षेत्र म्हणून समोर येते. काशीला येऊनही अंगिरस ऋषी निवांत होत नाहीत; उलट ते आपल्या संदीपक नावाच्या शिष्याची परीक्षा घेतात. यामधून गुरुचरित्र सूचित करते, की काशीमध्ये प्रवेश म्हणजे विश्रांती नव्हे, तर अंतःकरणाची कसोटी आहे. जेथे अहंकार, अपूर्णता आणि अवशिष्ट कर्म यांचे शुद्धीकरण अपरिहार्य आहे. याच परंपरेत पुढे श्री नृसिंह सरस्वती स्वामींच्या जीवनातील निर्णायक वळण येते. गुरुचरित्राच्या बाराव्या अध्यायात ते आपल्या आई-वडिलांचा निरोप घेऊन कारंजा या जन्मगावातून बाहेर पडतात. त्यांच्या पावलांची पहिली दिशा काशी क्षेत्राकडेच असते. हे निव्वळ प्रवासाचे वर्णन नाही; गृहत्यागानंतर आत्मतत्त्वाच्या शोधाची पहिली कसोटी काशीच ठरते. तेथे ते काशीविश्वेश्वराचे दर्शन घेतात आणि अत्यंत खडतर तपश्चर्येला आरंभ करतात. ही तपश्चर्या इतकी तीव्र आणि अंतर्मुख करणारी असते, की त्या काळात काशीमध्ये आधीपासून तप करत असलेले श्रीकृष्ण सरस्वती वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध तपस्वीयांनाही आश्चर्य वाटते. येथे गुरुचरित्र काशीला तपस्वींच्या संगमाचे आणि साधनेच्या उत्कटतेचे क्षेत्र म्हणून उभे करते.

याच काशी क्षेत्री पुढे श्री नृसिंह सरस्वती श्रीकृष्ण सरस्वतींना आपले गुरू मानून संन्यासदीक्षा स्वीकारतात. हा प्रसंग गुरुचरित्रातील केवळ वैयक्तिक दीक्षेचा क्षण नसून, गुरुपरंपरेचा अखंड प्रवाह दाखविणारा आहे. काशी येथे केवळ संन्यास दिला जात नाही, तर संन्यासाची पात्रता सिद्ध होते. पुढे श्री नृसिंह सरस्वती याच काशीमध्ये आपल्या अनेक अनुयायांना संन्यासदीक्षा देतात. त्यामुळे गुरुभक्तांच्या दृष्टीने काशी हे तीर्थक्षेत्र नसून गुरू-शिष्य परंपरेचा जीवंत आधारस्तंभ ठरते.

गुरुचरित्राच्या तेराव्या अध्यायात काशीचे स्वरूप आणखी खोल अर्थाने प्रकट होते. श्री गुरू आपल्या जन्मगावी परत येऊन आई-वडिलांना आशीर्वाद देतात आणि त्यांच्या उतारवयातील भविष्य सांगतात. ते स्पष्टपणे सांगतात, की त्यांचे आई-वडील पुढे काशी क्षेत्री जातील आणि तेथे देह ठेवतील. यावेळी श्री गुरू काशीला मुक्तीस्थान म्हणून संबोधतात. येथे काशी ही केवळ आयुष्याच्या एका टप्प्याची जागा न राहता जीवनाच्या अखेरच्या पूर्णतेचे प्रतीक बनते.

गुरुचरित्राच्या सतराव्या अध्यायात जेव्हा श्री गुरू वैजनाथ क्षेत्री गुप्तपणे वास्तव्यास असतात तेव्हा ते आपल्या शिष्यांना प्रथम काशीक्षेत्री जाण्याचा उपदेश करतात. कारण ते स्पष्ट करतात, की काशी हे या भूमंडळावरील तीर्थराज आहे. या विधानातून गुरुचरित्र काशीला इतर सर्व तीर्थांचा केंद्रबिंदू ठरवते, जेथे जाणे म्हणजे तीर्थयात्रेच्या मूळ तत्त्वाला स्पर्श करणे असे होते.

हे सर्व अर्थ पूर्णत्वास जातात गुरुचरित्राच्या एकेचाळीसाव्या अध्यायात. श्री गुरू सायनदेवांना काशीक्षेत्री जाण्याची आज्ञा देतात आणि काशीविश्वनाथाची आराधना करण्यास सांगतात. ते काशीला महाक्षेत्र म्हणतात, जेथे सर्व कार्य सिद्धीला जातात तेथेच ब्रह्मदेवाला सृष्टीचे आणि विष्णूला विश्वपालनाचे ज्ञान प्राप्त झाले, असे सांगून काशीचे वैश्विक स्थान अधोरेखित करतात. ते स्पष्ट करतात, की तेथे सर्व साधकांची साधना सफल होते, सर्व इच्छा पूर्ण होतात आणि चारी पुरुषार्थ प्राप्त होतात. काशीला 'आनंदकानन' असे संबोधून तेथे फिरताना प्रत्येक पावलागणिक अश्वमेध यज्ञाचे पुण्य मिळते, असे वर्णन करतात. इतकेच नव्हे तर काशी यात्रा कशी करावी, याचे सविस्तर विश्लेषणही याच अध्यायात केलेले आहे.

या सर्व प्रसंगांतून गुरुचरित्रात सांगितलेली काशी कशी आहे, हे स्पष्ट होते. काशी हे फक्त एक ठिकाण किंवा तीर्थक्षेत्र नाही, तर कर्मशुद्धीची परीक्षा, तपश्चर्येची भूमी, गुरुपरंपरेचे केंद्र आणि मुक्तीचा अंतिम संकेत आहे. अंगिरस ऋषींपासून श्री नृसिंह सरस्वतींपर्यंत काशी ही साधकाच्या अंतःप्रवासाची शांत, पण कठोर साक्षीदार राहिली आहे. आणि तरीही गुरुचरित्र सूचकपणे सांगते की काशी कितीही महान असली, तरी गुरुकृपेशिवाय तिचा खरा अर्थ उमगत नाही. जो गुरूच्या चरणी मन स्थिर करतो, त्याच्यासाठी काशी बाहेर नाही, तर त्याच्या अंतःकरणातच प्रकट होते.

**॥ अवधूतचिंतन श्री गुरुदेव दत्त ॥**
**॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥**

# 'जगतवंद्य अवधूत दिगंबर दत्तात्रय तुम्हीच ना'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दत्तभक्तांमध्ये प्रसिद्ध असलेले आणि कायम म्हटले जाणारे स्तोत्र 'जगतवंद्य अवधूत दिगंबर दत्तात्रय तुम्हीच ना' हे श्री योगी हरिनाथांनी रचलेले आहे. योगी हरिनाथ हे जोगन विठामाईंचे एकनिष्ठ शिष्य. जोगन विठामाई म्हणजे पूर्वजन्मीच्या सरस्वती, ज्यांना मच्छिन्द्रनाथांनी भस्म देऊन उत्तम पुत्रप्राप्ती होईल, हा आशीर्वाद दिला. भस्म पोटात घेण्याऐवजी त्यांनी उकिरड्यावर टाकले. त्यानंतर बारा वर्षांनी मच्छिन्द्रनाथ तेथे आले व उकिरड्यातून गोरक्षनाथांना बाहेर काढले. त्यावेळी सरस्वतीला अत्यंत शोक झाला. त्यावेळी बारा वर्षांच्या गोरक्षनाथांनी पुढील जन्मात हरिनाथ म्हणून पुत्राप्रमाणे तुझी सेवा करीन, असे आशीर्वचन दिले. त्या वचनपूर्तीस्तव त्यावेळच्या सरस्वती माता कोऱ्हाळे ग्रामी विठामाई म्हणून जन्माला आल्या.



श्री विठामाईंना सर्वजण आजी म्हणत असत. पौष त्रयोदशीला सन १९४१ मध्ये विठामाई समाधीस्त झाल्या. श्री हरिनाथांनी विठामाईंची पुत्राप्रमाणे अविरत सेवा केली. हरिनाथ माईंबरोबर कायम गाणगापूरला जायचे. श्री शंकर महाराज पूज्य विठामाईंना ओळखून होते. त्यांचे वागणे विचित्र होते. १९४३ मध्ये शुभरायमठात श्री शंकर महाराजांची आणि श्री हरिमामांची प्रत्यक्ष भेट अनेक वेळा झाली. नुकताच विठामाईंनी देह ठेवला होता. विरहाने व गुरुवियोगाने श्री हरिनाथ खूप व्याकूळ झाले होते. श्री हरिनाथांची निर्विकल्प समाधी लावून श्री दत्तप्रभूंचे दर्शन घडवून द्यावे, असा विचार शंकर महाराजांच्या मनात आला. श्रीक्षेत्र गाणगापूर येथे प्रकाशाच्या वलयात दत्तप्रभूंच्या जागेवर ध्यानामध्ये श्री हरिनाथांना श्री शंकर महाराज दिसले. प्रत्यक्ष भेट झाली तेव्हा महाराज म्हणाले, की हरी त्या दिवशी फार जोरात अभ्यास चालला होता. अशी योग्यता श्री शंकर महाराजांची होती.

एकदा श्री शंकर महाराज शुभरायमठात आले होते. हरिनाथांची पूजा-अर्चा, अनुष्ठान संपल्यावर महाराज म्हणाले, की ए हरी तुझ्या लंगोटीत नोटा आहेत, त्या बाहेर कधी काढणार? हरिनाथ उत्तरले, की महाराज जर नोटा असत्या तर मी असा कशाला राहिलो असतो? श्री शंकर महाराज म्हणाले, की ती एक नोट आहे ती दे. हरिनाथ संचार झाल्यासारखे ओरडले. नोटच काय पण नोटेचा कोपरासुद्धा कापून देणार नाही. महाराज म्हणाले, की विषय संपला, आता जगतवंद्य अवधूत दिगंबर हे पद म्हण. त्याप्रमाणे हरिनाथांनी ते पद म्हटले व महाराज समाधीस्त झाल्यावर हरिनाथांची स्वारी जेव्हा पुण्यात येत तेव्हा समाधीजवळ बसून हे पद म्हणत असत. नंतर हरिनाथांना त्या नोटेच्या कोपऱ्याबद्दल विचारणा केली तेव्हा ते म्हणाले, की श्री शंकर महाराजांची अशी इच्छा होती, की मी त्यांच्या समाधीनंतर त्यांची सेवा करायची व तेथील व्यवस्था पाहावी म्हणून ते माझाकडे नोट मागत होते. मी विठामाईंचा शिष्य आणि उत्तराधिकारी असल्याने मला ते काहीच शक्य नव्हते, म्हणून नोटेचा कोपरासुद्धा कापून देणार नाही म्हणजे मी काहीच करू शकणार नाही, असे सांगताच हा विषय संपला असे म्हणाले. यात महाराजांनी हरिनाथांची गुरुनिष्ठा किती आहे हे आजमावले होते. त्यांनी रचलेला ते पद असे.

जगत वंद्य अवधूत दिगंबर, दत्तात्रय गुरू तुम्हीच ना
अनन्य भावे शरणागत मी, भवभयवारण तुम्हीच ना
कार्तवीर्य यदु परशुरामही, प्रबोधिले गुरु तुम्हीच ना
स्वामी जनार्दन एकनाथ तरि, कृतार्थ केले तुम्हीच ना
नवनारायण सनाथ करुनी, पंथ निर्मिला तुम्हीच ना
मच्छिंद्रादि-यति प्रवृत्त केले, जनउध्दारा तुम्हीच ना
दासोपंताघरी रंगले, परमानंदे तुम्हीच ना
नाथसदनीचे चोपदार तरी, श्रीगुरुदत्त तुम्हीच ना
युगायुगी निजभक्तरक्षणा, अवतरतां गुरु तुम्हीच ना
बालोन्मत पिशाच्चवृत्ती, धारण करतां तुम्हीच ना ॥१॥

स्नान काशिपुरी चंदन पंढरी, संध्या सागरी तुम्हीच ना
करुनी भिक्षा करविरी भोजन, पांचाळेश्वरी तुम्हीच ना
तुळजापुरी करशुद्धी ताम्बुल, निद्रा माहुरी तुम्हीच ना
करुनि समाधि मग्न निरंतर, गिरनारी गुरु तुम्हीच ना
विप्रस्त्रियेच्या वचनी गुंतले, पीठापुरी गुरु तुम्हीच ना
श्रीपदवल्लभ नरसिंहसरस्वती, करंजनगरी तुम्हीच ना
जन्मताच ॐकार जपूनी, मौन धरियेले तुम्हीच ना
मौजीबंधन वेद वदोनि, जननि सुखविली तुम्हीच ना ॥२॥

चतुर्थाश्रम जीर्णोध्दारा, आश्रम घेऊ तुम्हीच ना
कृष्णसरस्वती सद्गुरु वंदुनी, तीर्था गमले तुम्हीच ना
माधवारण्य कृतार्थ केला, आश्रम देउनि तुम्हीच ना
पोटशुळाची व्यथा हरोनी, विप्र सुखाविला तुम्हीच ना
वेल उपटूनी विप्रा दिधला, हेमकुंभ गुरु तुम्हीच ना
तस्कर वधुनी विप्र रक्षिला, भक्तवत्सला तुम्हीच ना
विप्रस्त्रियेचा पुत्र उठविला, निष्ठा देखुनि तुम्हीच ना
हीन जिव्हा वेदपाठी, सजिव करुनी तुम्हीच ना ॥३॥

वाडी नरसिंह औदुंबरीही, वास्तव्य करुनी तुम्हीच ना
भीमाअमरजासंगमी आले, गाणगापूरी गुरू तुम्हीच ना
ब्रम्हमुहूर्ती संगमीस्थानी, अनुष्ठानी रत तुम्हीच ना
भिक्षा ग्रामी करुनी राहता, माध्यान्ही मठी तुम्हीच ना
ब्रम्हाराक्षसा मोक्ष देउनी, उद्धरिले मठी तुम्हीच ना
वांझमहिषी दुभविले, फुलवीले शुष्ककाष्ठ गुरु तुम्हीच ना
नंदीनमा कुष्ठी केला, दिव्य देहि गुरु तुम्हीच ना
त्रिविक्रमा विश्वरूप दाऊनि,कुमशी ग्रामी तुम्हीच ना ॥४॥

अगणित दिधले धान्य कापुनी, शुद्रशेत गुरु तुम्हीच ना
रतनाई कुष्ठ दवडिले, तीर्थे वर्णित तुम्हीच ना
आठही ग्रामी भिक्षा केली, दीपावलीदिनी तुम्हीच ना
भास्कर हस्ते चार सहस्त्रा, भोजन दिधले तुम्हीच ना
निमिषमात्रे तंतुक नेला, श्रीशैल्यासी तुम्हीच ना
सायंदेवा काशियात्रा, दाखविली गुरु तुम्हीच ना
चांडाळामुखी वेद वदविले, गर्व हराया तुम्हीच ना
साठ वर्ष वांझेसी दिधले, कन्यापुत्रही तुम्हीच ना ॥५॥

कृतार्थ केला मानसपूजनी, नरकेसरी गुरु तुम्हीच ना
माहुरचा सतीपति ऊठउनी, धर्म कथियला तुम्हीच ना
रजकाचा यवनराज बनवुनी, उद्धरिला गुरु तुम्हीच ना
अनन्यभावे भजता सेवक, तरतिल वदले तुम्हीच ना
कर्दळीवनीचा बहाणा करुनी, गाणगापुरीस्थित तुम्हीच ना
निर्गुण पादुका दृष ठेऊनी, गुप्त स्वामी मठी तुम्हीच ना
विठामाईचा दास मूढ परि, अंगिकारिला तुम्हीच ना
आत्मचिंतनी रमवा निशिदिनी, दीनानाथ गुरु तुम्हीच ना ॥६॥

**॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥**

# गृहकलह नाशक यंत्र

गृहकलह नाशक यंत्र कुटुंबप्रमुखाने स्वतःच्या हाताने तांबड्या कागदावर किंवा कापडावर काळ्या शाईने लिहून स्वयंपाकघराच्या दक्षिणेकडील भिंतीवर चिकटवून रोज सकाळ-सायंकाळ अगरबत्ती ओवाळावी. या यंत्राच्या प्रभावामुळे कौटुंबिक कलह, हेवेदावे, वादविवाद व राग-लोभाचे उच्चाटन होण्यास मदत होते.


| | | |
|---|---|---|
| ३६ | २९ | ३४ |
| ३१ | ३३ | ३५ |
| ३२ | ३७ | ३० |

# सद्गुरू शंकर महाराजांची कृपादृष्टी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अभावातून सक्षमतेकडे, मर्यादेतून स्वातंत्र्याकडे आणि गरजेतून समाधानाकडे झालेली वाटचाल हे सगळेही संक्रमणच आहे. जे भाड्याच्या घरात राहत होते त्यांचे स्वतःचे घर झाले.

ज्यांना सार्वजनिक वाहनांनी प्रवास करावा लागत होता, त्यांच्याकडे स्वतःची व्यक्तिगत मोटार आली. ज्यांची पद-प्रतिष्ठेची स्वप्ने होती, त्यांना ती प्रत्यक्षात मिळाली. पण येथेच थांबायचे नाही.



या भौतिक संक्रमणासोबत आपल्या स्वभावात, विचारांत, वृत्तीत आणि मूल्यांत काही सकारात्मक बदल झाला का हा प्रश्न स्वतःला विचारणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण घर, गाडी, पैसा, पद-प्रतिष्ठा असणे-नसणे म्हणजे संक्रमण नाही. खरे संक्रमण माणसाच्या जाणिवेत होत असते आणि त्या जाणिवेच्या परिवर्तनासाठी महाराज समर्थ आहेतच.

**!! अवधूत चिंतन राजाधिराज योगीराज श्रीमंत सद्गुरू श्री शंकर बाबा महाराज की जय !!**

# नामाचा अनुभव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नामाचा अनुभव कोणता? नामाचा अनुभव नामाव्यतिरिक्त दुसऱ्या कशात पाहू नये; म्हणजे नामापासून दुसरे काही मिळवायचे आहे ही कल्पनाच नसावी. नाम मुखी येते हाच नामाचा अनुभव. ज्या प्रमाणात आपल्या हातून नामस्मरण घडले त्या प्रमाणात आपल्याला नामाचा अनुभव आला, असे समजावे. अखंड नामस्मरण टिकले की पुरा अनुभव आला. नामस्मरण करता-करता चित्त एकाग्र होते. देहबुद्धी विसरून नाम घेणे हेच निर्गुण होणे आहे. मी कोण आहे हे कसे ओळखावे? मी कोण आहे हे ओळखायला जडाने म्हणजे वाचेनेच नाम घेण्यास सुरूवात करावी आणि ते नाम अखंड घेण्याचा प्रयत्न करावा. मग ते मनाने आतल्या आत होऊ लागते. पहिल्यानेच आपल्या प्रयत्नाने मनाला नामाचे वळण लावण्याच्या नादी लागू नये. कारण ते फारच अवघड आहे. नाम घेता-घेता देहाचा विसर पडल्यावर मी कोण आणि देव कोण हे आपोआप कळेल.



भगवंताच्या नामाचा नाद लागला, तर दुःखाची जाणीव नसल्यावर दुःख असले म्हणून बिघडले कुठे? काळोख्या रात्री जशी काठी आधार असते तसे संसारात नाम आहे. खाचखळगे काठीच्या योगाने टाळता येतात तसे मोह लोभ इत्यादी संसारातील अडचणी नामाने समजतात आणि दूर करता येतात. विस्तवाजवळ तूप ठेवले की ते वितळते तसे नामाची शेगडी ठेवली, की अभिमान वितळलाच पाहिजे. हाच नामाचा अनुभव. पण लोक नामाबद्दल ऐकूनच घेत नाहीत; जर कोणी ऐकून घेतले तर ते बिंबवून घेत नाहीत त्याचे मनन करीत नाहीत; आणि मनन करून ज्यांना ते पटले ते पटले असूनही नाम घेत नाहीत. अडचणी असल्या तरी नाम घेता येते म्हणून नामस्मरण न करण्याबद्दल सबबी सांगू नका. सबब सांगितली, की त्यापासून लबाडी उत्पन्न होते. लबाडीतून आळस उत्पन्न होतो आणि आळसाने सर्वनाश होतो. आपण रोज उठल्यावर भगवंताचे स्मरण करण्याचा नियम ठेवावा. स्नान वगैरे गोष्टी झाल्या तर कराव्याच. पण त्यांच्यावाचून अडून बसू नये. भगवंताचे स्मरण हे मुख्य आहे. अखंड नामस्मरण ठेवायला सोवळ्या-ओवळ्याचे बंधन नाही. अखंड स्मरणच सोवळे आहे.

उपासना कोणतीही असली, तरी नामाशिवाय ती पचनी पडत नाही. महत्त्व नामाला आहे. निरनिराळ्या देशातील अन्न निरनिराळे असू शकते. पण ते पचविण्याकरिता लागणारे पाणी येथून-तेथून सर्व सारखेच. पाण्याशिवाय कोणतेही अन्न पचणार नाही. त्याप्रमाणे उपासनारूपी अन्नाला पचविण्यासाठी नामरूपी पाण्याची जरूरी आहे. म्हणून नामाला महत्त्व देऊन ते सतत घेण्याचा अभ्यास करावा. कसाही प्रसंग आला तरी नामस्मरण सोडू नका. त्यातून परमात्मा हात देईल. नाम घ्यायला स्वतःचीच आडकाठी असते. ती दूर केली तर नामाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही.